# शिवाजी महाराज यांच्या वतनदारी पद्धती मुळे स्वराज्यात झालेले बदल

**स्वाती आप्पासाहेब चेके** संशोधक विद्यार्थी पीएच.डी. विभाग इतिहास विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

---

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे संपुर्ण जीवनच एक संघर्ष यात्रा आहे परंतु छत्रपती महाराजांनी केलेला संघर्ष फक्त मैदानी लढ्यापुरता मार्यादित नव्हता. महाराजांनी आपल्या आयुष्यात अनेक धाडसी विचार मांडले आणि ते त्यांनी प्रत्यक्षात अंमलात आणायला स्वत:पासुन सुरूवात केली. महाराजांनी आपल्या कारकिर्दीत प्रत्यक्ष दाखवुन दिले आहे. की परंतु दुर्देवाने इतिहासकार मंडळींना आतापर्यंत शिवाजी महाराजांचे चरित्र फक्त अफजलखान आणि शायिस्तेखान अशाच प्रकरणामध्ये गुंडाळुन महाराजाच्या विशाल आणि दैईष्ट मान चरित्रावर खुप मोठा अन्याय केलेला आह. छत्रपती महाराजांना लढाया व्यतिरिक्त दुसरे काही येत नसावे असाच लिखाणाचा रोख ठेवला गेला.

परंतु वास्तवात पहिले तर महाराजांनी लढायापेक्षा सामाजिक क्षेत्रात उघडलेली (आघाडी) आणि मिळालेले निर्णायक विजय हेही समाजासाठी परिवर्तनवादी चळवळीसाठी पायाभरणी करणारेच होते. महाराजांनी 35 वर्ष केलेला संघर्ष हा मुळी राजा होण्याच्या हेतुने नव्हताच तर ती संघर्ष होता या देशातील भुमिपुजांना परकीय सत्तेच गुलामीतुन मुक्त करणे गोरगरिब उपेक्षित लोकांना त्यांचा हक्क मिळवुन देणे आणि त्योच जीवन भयमुक्त करणे हाच महाराजांचा लढ्याचा मुळ उद्देश होता.

महाराजांनी जाती धर्माचे राजकारण कधीच केले नाही. सर्वसाधारण रयतेचे काम करताना जात, धर्म पाहिला नाही आणि चालुन आलेल्या शत्रुला त्याचे कुळ, गोत्र, जात, धर्म, वर्ण याचा अजिबात गर्वपणा न ठेवता प्रामाणिकपणे राष्ट्रीय कर्तव्य कठोरपणे पार पाडले. अठरा पगड जातींना तर महाराजांनी एकत्र करून जाती पातीच्या भिंती न पाडुन एक ऐतिहासिक क्रांती करतांना सर्वांना एकच नाव ठेवले गेले 'मावळा'.

**शिवाजी महाराज यांची वतनदारी चे महत्त्व :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात ज्या सामाजिक आर्थिक संस्था अस्तित्वात होत्या त्यामध्ये वतन हि अत्यंत महत्वाची संस्था होती. (वतन) हा अरेबिक शब्द आहे मुसलमानी कालखंडात हा महाराष्ट्रात रूढ झाला या शब्दाचा अर्थ जात, धंदा, वंश परंपरागत काम, नोकरी उत्पन्न अधिकारी मानपान, हक्क जंगम मालमत्ता, जन्म भुमी असा होतो. मराठेकाळात वतनाला व्यापक अर्थ होता जे लोक गावातील कायमचे रहिवाशी होते ज्यांना सारा मुक्त जमीन होती, ज्यांना सरकारी व गावातील कामे करावी लागत होती, ज्यांना आपल्या जाती नुसारच व्यवसाय करता येत होते व जाती नुसार हक्क व मानपान आणि सामाजिक दर्जा प्राप्त होत अशा व्यवस्थेला वतनदारी म्हणत असत.

मराठेकालीन मानसाच्या जीवनातील प्रत्येक धार्मिक बाब वतनामध्ये समाविष्ट केली होती वतनामध्ये इनाम जमीन तर असेच पण त्याच बरोबर काही हक्क व मानपानही गृहीत धरत असत. वतनदारांना वतनाची खरेदी विक्री करण्याचे भेट म्हणुन इतरांना वतन देण्याचे अधिकारी होते सरकारी नोकरांना सरकार कडुन बक्षीस म्हणुन दिलेली. सनद म्हणजे वतन होय महाराष्ट्रात वतनाला अधिक व विस्तुत प्रमाणात अर्थप्राप्त झाला होता.

थोडक्यात असे म्हणता येईल की, छत्रपती महाराजांना वतनदाराविषयी आदर होता. मराठे काळात वतन प्रतिष्ठेचे साधन समजले जात होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जुनी वतने चालविली होती, विशिष्ट अशा प्रकारची नवी वतने दिली होती वतनदारांच्या हक्कांचे व मानपानाचे रक्षण केले होते. वतनदारीचा उपयोग स्वराज्य रक्षणासाठी करण्यात आला होता छत्रपतीच्या वतन धोरणाचा भंग करणाऱ्यांना कठोर शिक्षा, करण्यात येत होत्या वतनाच्या हस्तांतरणाच्या सर्व व्यवहारांना छत्रपतीची मान्यता घ्यावी लागत असे, मराठे कालीन वतन विषयक धोरणाचा विचार करण्यासाठी सभासदाची बखर, आज्ञापत्र, शिवकालीन कागदपत्रे व इतिहासकाराचे ग्रंथ, यांचा आधार घ्यावा लागतो परंतु शिवाजी महाराजांच्या वतन विषयक धोरणाचा नव्याने विचार करतांना असे दिसते की, छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण त्यांच्या पुर्व सुरीच्या वतन विषयक धोरणापेक्षा वेगळे होते.

**वतनदारी पद्धतीत स्वराज्यात केलेले बदल :**

अदिलशाही निजामधाही, मोगलाई देश (शिवाजीने) कब्जा केला या देशांतील रयत पाटील कुलकर्णी व देशमुख यांचे हाती पानी कमावीस करावी व सरकारात मोघम टक्का द्यावा. पा. मिरासदारांनी हजार दोन हजार रूपये व गावातील रयतेपासून वसुल करावे असा नियम लागु केला होता त्यापैकी दोन तीनशे रूपये दिवाणांत सरकारच्या खंडमकता म्हणून भरावे त्यामुळे मिरासदार पैकेकरी होऊन गावात हुडे , वाडे, कोट बांधून टपाले व बदुखी ठेवून बळकावले दिवाणास सरकारी अधिकाऱ्यास भेटणे नाही त्यातल्या त्यास दोष दिल्लास हे मिराजदार त्यांच्याशी भांडायला उभे राहत या प्रकारे मिरासदार पुंड होऊन बळखावलेले म्हणून राजाने देश काबीज करून हुडे, वाडे कोट पाडले कोट मिरासदारांच्या हातांतली सत्ता काढून घेतली देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी पांस सरकारी करांच्या वसुलीबद्दल घ्यावायाचा हक्क बांधुन दिला व जमिनदारांनी वाडा बुरूजांचा बाजु नवे घर बांधुन राहावे असा मुलुखाचा बंदोबस्त केला.

प्रल्हाद निराजीने इ.स. 1686 जानेवारी 17 च्या एका निवाड्यांत शिवाजीच्या वतन विषयक धोरणाचे एक सुज सांगितले आहे, छत्रपतीस्वामीचा तह की वतनदाराचे वतन कोणी विकत घेऊ नये व वतनदाराने ते विकू नये जो विकत घेईल त्यांच्यापासून गुन्हेगारी घ्यावी व वकिलास त्यास ताकीद द्यावी.

मौजे आळंद तर्क यांची हिरडस मावळ या गांवाची निम्मी पाटीलकी पुर्वीपासून होती त्यास शिवाजीने त्यांच्या सैनिकी सहाय्याबद्दल त्या गावची 17 टक्के जमीन इनाम दिली.

पुरंदर किल्ला शिवाजीने मोगलांपासून घेतला त्यापूर्वी किल्ल्यावरील तास वाजविण्याची वृत्ति मिरासदार ज्योतिषी शिवभट दादभट बिन दादभट व नारायणभट बिन रामभट पुरंदरे याकडे होती. यानंतर शिवाजी महाराज पुरंदरावर आल्याची संधि साधून शिव भट व नारायणभट यांनी महाराजांस भेटून आपल्या पिढिजात वृत्तीची त्यांच्या जवळ मागणी केली महाराजांचा आणि शिवभट व नारायणभट यांची भेट पुन्हा झाली नाही व महाराज मरून गेले सभाजी महाराजांच्या कारकीर्दीत या प्रकरणाची चौकशी होवुन शिवभट व नारायभट यांची सही होऊन 1605 मध्ये पुरदरावरील तासाची मिरास त्यास देण्यात आली.

पुर्वी सत्तांतर झाल्यानंतर पहिल्या राजवटीतील इनामे व हक्क संबंध जप्त करण्याचा रिवाज असे पहिली जप्ती झाली म्हणजे मग चौकशी करून व युक्ता युक्ती पाहून जप्त केलेली इनामे व हक्क संबंध पुन्हा सुरू करण्यात येत त्या पद्धतीप्रमाणे शिवाजी ने के. सो. नाईक मावळगकर याचे इनाम व हक्क संबंध जप्त करून मागवून ते आपले काम इमानाने करण्याविषयी तेव्हा पासून खात्री करून घेतल्यावर त्यांचे सरदेसाईपणाचे वतन पुन्हा सुरू केले.

वदनदारीची उपयुक्तता इंग्रज सरकारसहीत पटून त्यांनी गावचा कारभार वतनदार गांवकामगारांपासूनच करून घेतला. अलीकडे तीस पसतीस वर्षात गांवातल्या कुलकर्णी तेवढा त्यांनी उडविला पण आत्ताच्या सरकारने गांवकीच्या म्हणजे ग्रांमपचायत पत्रकारिता बलुतेदारांना असलेली इनामे खालसा करून सुटका रोपयोगी इनामे म्हणजे वतने आद्यापि चालू ठेवली आहेत. याचे करण ती आधुनिक काळांत गांवगाडा मोडल्यामुळे बलुतेदारी नाम मात्र उरली.

शिवाजीने केसो नाईक मावळंगाकर यांचे इनाम व हक्क संबंध जप्त करून मागहून ते आपले काम इमानाने करण्याविषयी त्याच्या पासून खात्री करून घेतल्यावर त्याचे सरदेसाईपणाचे वतन पुन्हा सुरू केले.

पुण्याचे बाजीराव होनप हे शिवकालांत देश कुलकर्णी होते ते मोगलांस सामील झाल्यामुळे शिवाजीने त्याचे वतन जप्त केले.

शिवाजी महाराजांना वतनदारी अजिबात नष्ट करावयाची असती तर सरदेसाईपणाचे हे वतन शिवाजी महाराजांनी मावळगकरास पुन्हा बहाल केले नसते प्रभावशाली मामल्याचा जो वसुल भावळंगकर पात्र मार्फत होईल त्यांतुन त्यांनी पट्टी पसोडभ्, हक्क व दोन हजान ने घ्यावे असे ठरविण्यात आले.

यावरून सर्व वतने काढून घेण्याचा शिवाजीचा इरादा नव्हताच उलट तो नवीन वतने देता येत होते त्याचे कारण असे सर्व वतने काढून घेतली असती तर ती एक फार मोठी क्रांति ठरली असती राज्यकारभाराला वतनदारीपासून जप्त होऊ नये एवढाच त्याचा उद्देश होत्या ते साध्य करण्यापुरतेच फेरबद्दल वतनदारी पद्धतीत केले नोकरांकरिता आवश्यक असा निधि तो आणणार कसा व कोठून हीच अडचण तत्कालीन व तत्पुर्वीच्या राज्य कर्त्यांपुढे असल्यामुळे वतनदारी पद्धती आस्तित्त्वात आली होती हे विसरता कामा नये.

**संदर्भ :**


1. डॉ. वी. व्ही. चौधरी, लेखक संग्रहातील लेख मराठवाडा इतिहास परिषद निवडक शोध निबंध
2. गवळी पी. अे., पेशवे कालीन समाज व जातीय संघर्ष
3. देशपांडे प्र. न., छत्रपती शिवाजी महाराजांचे पत्र
4. डॉ. अ.रा. कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र
5. प्रा. नामदेवराव जाधव, शिवराय, (स्वराज्यासाठी लढलेल्या राष्ट्रनिष्ट मुस्लीमांचा खरा इतिहास )
6. वासुदेव कुष्ण भावे, शिवराज व शिवकाल, (शिवकालीन महाराष्ट्र)